आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार, दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपची सत्ता येईल असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास.
2. बुलढाणा, वर्धा, आणि अमरावतीसह राज्यात आठ वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी दिल्याची केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती.
3. खरीप हंगाम 2023 मध्ये झालेल्या अधिकच्या नुकसान भरपाई पोटी चंद्रपूरसह 6 जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना 1 हजार 927 कोटी मिळणार.
4. ७ ऑक्टोबर पर्यंत साजऱ्या होणाऱ्या वन्यजीव सप्ताहास आजपासून सुरुवात.
5. उद्या महात्मा गांधी जयंती सर्वत्र विविध उपक्रमांनी साजरी होणार.

****

अमित शाह

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार येणार आहे, असा विश्वास मुंबईत झालेल्या भाजप कार्यकर्ता परिषदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. भाजप कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत निवडणुकीसाठी सज्ज राहण्याची सूचना त्यांनी केली. आज मुंबईत शहा यांनी मुंबईतील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. राज्यात भाजपचे सरकार स्थापन करण्यासाठी कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून द्यावं असं आवाहन शाह यांनी केलं .

****

आठ वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी

बुलढाणा, जालना, अमरावती, वर्धा जिल्ह्यासह राज्यातील एकूण आठ वैद्यकीय महाविद्यालयांना अटी आणि शर्तीच्या अधीन राहून राष्ट्रीय आरोग्य विज्ञान विभागानं मान्यता दिली असून याच सत्रापासून हे आठही वैद्यकीय महाविद्यालय सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य आयुष्यमान मंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा इथं आज पत्रकार परिषदेत दिली. या आठही महाविद्यालयांची वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया याच वर्षी सुरु होणार असून वैद्यकीय प्रवेशाचा तिसरा राऊंड अद्याप बाकी असल्याने या राऊंड मधील येथील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल. असं मंत्री जाधव यांनी सांगितलं. बुलढाणा वैद्यकीय महाविद्यालयासाठी

बाराशे कोटी रुपये मंजूर झाले असून त्यापैकी 403 कोटी रुपये किमतीचे कंत्राट काढण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

****

कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केला आहे. विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींशी आज त्यांनी नवी दिल्ली इथं चर्चा केली. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. बियाणं आणि खतांची उपलब्धता तसंच खतांचा अतिवापर या मुद्यांवर यावेळी अर्थपूर्ण विधायक चर्चा झाल्याचं शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितलं.

****

पीक विमा

राज्यातील सर्वसमावेशक पीक योजनेअंतर्गत खरीप हंगाम 2023 मधील झालेल्या अधिकच्या नुकसान भरपाई पोटी राज्य शासनाने पीक विम्याची रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला वर्ग करण्यासाठी मान्यता दिली आहे. त्यामुळे चंद्रपूरसह 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पोटी 1 हजार 927 कोटी लवकरच मिळतील, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. नाशिक, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, सातारा आणि चंद्रपूर या सहा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून चंद्रपूर साठी ५८.९० कोटी रुपये जारी करण्यात आले आहेत.

****

राहुल गांधी

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी हे दिनांक ४ आणि ५ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण राहुल गांधी यांच्या हस्ते होणार असून कोल्हापूर इथं होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार असल्याची माहिती विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी दिली.

****

राज्यपाल वर्धा दौरा

महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन उद्यापासून दोन दिवस वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात ते सेवाग्राम आश्रमाला भेट देणार आहेत. तसंच नियोजित कार्यक्रमानुसार अभ्यागतांशी संवाद साधणार आहे.

****

आकाशवाणी स्वच्छता

'स्वच्छता ही सेवा-२०२४' या अभियानातंर्गत विविध सरकारी आणि खाजगी आस्थापनांमध्ये स्वच्छता कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. आकाशवाणीच्या नागपूर केंद्रात आज स्वच्छता कर्मचारी आणि सफाई मित्रांसाठी आरोग्य शिबिराचं आयोजन, आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या, नागपुरातील राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण कार्यालय, तसाच वर्ध्याच्या आंतर राष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालयात देखील स्वच्छता पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

****

स्वच्छता संदेश

स्वच्छ भारत अभियानांतर्गत यंदा देशात २४ लाखांहून अधिक कार्यक्रम झाले. स्वच्छता ही सेवा अभियानात यावर्षी २० कोटींहून अधिक नागरिक सहभागी झाले अशी माहिती केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिली आहे. देशभरातले ३८ लाख सफाई मित्र यात सहभागी झाले होते. ऐकुया प्रसिद्ध अभिनेते राजेश चिटणीस यांचा स्वच्छता संदेश -

*स्वच्छता ही एक सेवा नव्हे तर हे एक आपलं कर्तव्य आहे. आपण जिथे राहतो म्हणजे आपल्या घरामध्ये आपण उटसूट कधीही कागद घेतला इकडे तिकडे फेकला. कुठलाही कचरा अस्था वेस्था आपण टाकलेला आपण कधी ही असं बघतोय नाही ना. मग आपल शहर हे सुद्धा आपल घर आहे. त्यामुळे आपण जिथे काम करतो. ज्या कार्यालयात काम करतो जिथे जातो आणि ज्या शहरात राहतो आपण ते शहर आजूबाजूची जागा ही नेहमी स्वच्छ असायला हवी कारण की काय होत आपणही अस्वच्छता करून आजारांना आमंत्रण देतो त्याच्यामुळे आपलं शहर आपलं घर आणि आपले आजूबाजूची जी काही जागा असेल ती आपण नेहमी स्वच्छ ठेवावी ही आपण सगळ्यांनी शपथ घ्यायला हवी. तेव्हा मी कचरा करणार नाही ही शपथ सगळ्यांनी घ्या.*

****

विमानतळ विकासकाम बैठक

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईच्या सह्याद्री अतिथिगृह इथं आज सकाळी नागपूर, शिर्डी, अमरावती विमानतळ विकास कामासंदर्भात संदर्भात बैठक घेतली. याप्रसंगी नागपूर विमानतळ अद्यावतीकरण-सवलत करारावर स्वाक्षरी,अमरावती विमानतळ टर्मिनलच्या उदघाटनाबाबत तसेच शिर्डी विमानतळ अद्यावतीकरण याबाबत चर्चा करण्यात आली.

****

वन्यजीव सप्ताह

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील वन्यजीव सप्ताह १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. यावर्षी वन्यजीव सप्ताहाचा विषय" वन्यजीव संरक्षणाच्या माध्यमातून सहअस्तित्व" असून याअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. प्रादेशिक वनविभाग, वन्यजीव वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आज वन्यजीव सप्ताहाचं उद्घाटन मानवी हार तयार करुन वनसंरक्षक नागपूर, श्रीलक्ष्मी ए. यांच्या हस्ते करण्यात आलं. या मानवी हाराची एकूण लांबी दीड किमी इतकी होती. एकूण ४०० विद्यार्थी आणि अधिकारी या उपक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या हातात वन्यप्राणी वाघाची प्रतिकात्मक मूर्ती देवून 'जंगल वाचवा, वन्यजीव वाचवा' अशा घोषणेने करण्यात आली. विद्यार्थ्यांना वने आणि वन्यजीवाबाबत माहिती देवून त्यांच्या संरक्षणार्थ घोषणा देण्यात आल्या. प्रादेशिक वनविभाग, वन्यजीव वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने हे कार्यक्रम पार पडले.

****

गांधी जयंती

महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, आणि जिल्हा प्रशासन अमरावती, यांच्या संयुक्त विद्यमाने मोर्शी मार्गावरील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन इथं उद्या बुधवार दिनांक २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता 'महात्मा गांधींचा जीवनप्रवास' या विषयावर आधारित मल्टिमीडीया छायाचित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. ४ ऑक्टोबर पर्यंत चालणार हे प्रदर्शन निःशुल्क ठेवण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याद्वारे महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य

साधत  राष्ट्रीय पोषण माह मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.

****

उद्या दोन ऑक्टोबर रोजी साजरा होणाऱ्या गांधी जयंती निमित्त, जागतिक अहिंसा दिन आयोजन समिती आणि नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 155 व्या जयंतीनिमित्त अभिवादन आणि सूर संगम भक्तिरस गायनाचा कार्यक्रम 'बापू तुम्हे  प्रणाम' चे  आयोजन करण्यात आले आहे. उद्या  सकाळी साडेआठ वाजता व्हेरायटी चौक गांधी पुतळा इथं हा कार्यक्रम होणार  आहे. या  कार्यक्रमाला  प्रमुख  अतिथी  लीलाताई  चितळे  आणि प्राध्यापक चंद्रशेखर वानखेडे हे असतील, नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे आणि संयोजक विलास मुद्देवार यांची कार्यक्रमाला उपस्थिती असेल.

****

वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उद्या 'स्वच्छ भारत दिवस' म्हणून साजरी केली जाणार आहे. स्वच्छतेवर आधारित पथनाट्याचे सादरीकरण, 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' आणि  सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे. उद्या  कुलगुरूंच्या  अध्यक्षतेखाली 'सर्जनशील कार्यक्रम: प्रयोग आणि आव्हाने' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राच देखील उद्घाटन करण्यात येईल.

****

'महाराष्ट्र स्वराज्य पक्ष

माजी राज्यसभा खासदार संभाजी राजे छत्रपती यांनी ०९ ऑगस्ट २०२२ रोजी स्थापन केलेली "स्वराज्य संघटना" आता "महाराष्ट्र स्वराज्य पक्ष" नावाने ओळखली  जाणार  असल्याची माहिती संभाजी राजे यांनी समाजमाध्यमवरून दिली आहे. "महाराष्ट्र स्वराज्य पक्ष" या नावाने एक राजकीय पक्ष म्हणून भारतीय निवडणूक आयोगाकडे अधिकृतपणे नोंदणी झालेल्या या पक्षाला आगामी विधानसभा निवडणुकीसाठी "सप्तकिरणांसह पेनाची निब" हे निवडणूक चिन्ह प्राप्त झालं आहे.

*****